# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/078/2021-2023

**YEAR : 48)** **1st January 2023 ( No. of Pages 08 )** **( No : 01**



# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ८, अंक ४१(२) गुरुवार, नोव्हेंबर २४, २०२२/अग्रहायण ३, शके १९४४ पृष्ठे ९, किंमत : रुपये २७.००


## *असाधारण क्रमांक ८७ : प्राधिकृत प्रकाशन*

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद)**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Kavi Kulaguru Kalidas Sanskrit Vishvavidyalaya (University) and Maharashtra Public Universities (Amendment) Ordinance, 2022 (Mah. Ord. XIII of 2022), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH WAGHOLE,
I/c. Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Kavi Kulaguru Kalidas Sanskrit Vishvavidyalaya (University) and Maharashtra Public Universities (Amendment) Ordinance, 2022 (Mah. Ord. XIII of 2022), published under the authority of the Governor.]

---

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,

**dated the 24th November 2022.**

# MAHARASHTRA ORDINANCE No. XIII OF 2022.

*AN ORDINANCE*

*further to amend the Yashwantrao Chavan Maharashtra Open University Act, 1989, the Kavi Kulaguru Kalidas Sanskrit Vishvavidyalaya (University) Act, 1997 and the Maharashtra Public Universities Act, 2016.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Yashwantrao Chavan Maharashtra Open University Act, 1989, the Kavi Kulaguru Kalidas Sanskrit Vishvavidyalaya (University) Act, 1997 and the Maharashtra Public Universities Act, 2016, *(Mah. XX of 1989. Mah. XXXIII of 1997. Mah. VI of 2017.)* for the purposes hereinafter appearing;

NOW THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (1) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :-

### *CHAPTER I*
### PRELIMINARY

**Short title and commencement.**

**1.** (1) This Ordinance may be called the Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Kavi Kulaguru Kalidas Sanskrit Vishvavidyalaya (University) and Maharashtra Public Universities (Amendment) Ordinance, 2022.

(2) It shall come into force at once.

## *CHAPTER II*

### AMENDMENTS TO THE YASHWANTRAO CHAVAN MAHARASHTRA OPEN UNIVERSITY ACT, 1989.

**Amendment of section 10 of Mah. XX of 1989.**

**2.** In section 10 of the Yashwantrao Chavan Maharashtra Open University Act, 1989 *(Mah. XX of 1989.)* (hereinafter referred to as "the Open University Act"), -

(1) in sub-section (1), -

(a) in clause (a), -

(i) for the words "a Committee" the words "a search-cumselection committee" shall be substituted;

(ii) for sub-clause (i), the following sub-clause shall be substituted, namely :-

"(i) a member nominated by the Chancellor, who shall be a person of eminence in the sphere of higher education and shall be either an eminent scholar of national repute or a recipient of Padma Award in the field of education;";

(iii) after sub-clause (iii), the following sub-clause shall be inserted, namely:-

"(iv) a member to be nominated by the Chairman, University Grants Commission;";

(b) for clause (c), the following clause shall be substituted, namely :-

"(c) The members nominated on the committee shall be persons who are not connected in any manner with the University or any college or any recognized institution of the University;";

(c) in clause (d), the word "three" shall be deleted;

(2) in sub-section (1D),-

(a) for clause (a), the following clauses shall be substituted, namely :-

"(a) be a person possessing highest level of competence, integrity, morals and institutional commitment ;

(a-1) be a distinguished academician, with a minimum of ten years of experience as a Professor in any university or ten years of experience in a reputed research or academic administrative organisation with proof of having demonstrated academic leadership;";

(b) in clause (d), for the words "educational qualifications" the words "additional educational qualifications" shall be substituted;

(3) after sub-section (1F), the following sub-section shall be inserted, namely :-

"(1G) If a person selected by the Chancellor does not take over the charge of the post of Vice- Chancellor, the Chancellor may select another suitable person from the remaining persons from the panel or he may call for a fresh panel either from the same committee or after constitution of a new committee for the purpose, from such new committee.".

**Substitution of section 10A of Mah. XX of 1989.**

**3.** For section 10A of the Open University Act, the following section shall be substituted, namely :-

**Pro-ViceChancellor.**

**"10A.** It shall be the prerogative of the Vice-Chancellor to recommend a person to be the Pro-Vice-Chancellor to the Board of Management. The Board of Management shall, on the recommendation of the Vice-Chancellor, appoint a Pro-Vice-Chancellor for the University. The Pro-Vice-Chancellor shall be appointed for such terms and on such emoluments and other conditions of services and shall exercise such powers and perform such functions, as may be prescribed by the Statutes.".

## *CHAPTER III*

### AMENDMENTS TO THE KAVI KULAGURU KALIDAS SANSKRIT VISHVAVIDYALAYA (UNIVERSITY) ACT, 1997.

**Amendment of section 12 of Mah. XXXIII of 1997.**

**4.** In section 12 of the Kavi Kulaguru Kalidas Sanskrit Vishvavidyalaya (University) Act, 1997 *(Mah. XXXIII of 1997.)* (hereinafter referred to as "the Sanskrit Vishvavidyalaya (University) Act"),-

(1) in sub-section (1),—

(a) in clause (a),—

(i) for the words "a Committee" the words "a search-cumselection committee" shall be substituted;

(ii) for sub-clause (i), the following sub-clause shall be substituted, namely :-

"(i) a member nominated by the *Kuladhipati,* who shall be a person of eminence in the sphere of higher education and shall be either an eminent scholar of national repute or a recipient of *Padma* Award in the field of education;";

(iii) after sub-clause (iii), the following sub-clause shall be inserted, namely :-

(iv) a member nominated by the Chairman, University Grants Commission;";

(b) for clause (c), the following clause shall be substituted, namely :-

"(c) The members nominated on the committee shall be persons who are not connected in any manner with the university or any college or any recognised institution of the university;";

(c) in clause (d), the word "three" shall be deleted;

(2) in sub-section (3A),-

(a) for clause (a), the following clauses shall be substituted, namely :-

"(a) be a person possessing highest level of competence, integrity, morals and institutional commitment;

(a-1) be a distinguished academician, with a minimum of ten years of experience as Professor in any University or ten years of experience in a reputed research or academic administrative organisation with proof of having demonstrated academic leadership;";

(b) in clause (d), for the words "educational qualifications" the words "additional educational qualifications" shall be substituted;

(3) in sub-section (4),-

(a) before the existing proviso, the following proviso shall be inserted, namely :-

"Provided that, if a person selected by the *Kuladhipati* does not take over the charge of

the post of the *Kulaguru,* the *Kuladhipati* may select another suitable person from the remaining persons from the panel or he may call for a fresh panel either from the same committee or after constitution of a new committee for the purpose, from such new committee:";

(b) in the existing proviso, for the words "Provided, however, that" the words "Provided further that," shall be substituted.

**Amendment of section 13 of Mah. XXXIII of 1997.**

**5.** In section 13 of the Sanskrit Vishvavidyalaya (University) Act, for sub-section (1), the following sub-section shall be substituted, namely :—

"(1) It shall be the prerogative of the *Kulaguru* to recommend a person to be the *Sama-Kulaguru* to the *Vyavasthapana Parishad.* The *Vyavasthapana Parishad* shall, on the recommendation of *Kulaguru,* appoint a *Sama-Kulaguru* for the university.".

## *CHAPTER IV*

## AMENDMENTS TO THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

**Amendment of section 11 of Mah. VI of 2017.**

**6.** In section 11 of the Maharashtra Public Universities Act, 2016 *(Mah. VI of 2017.)* (hereinafter referred to as " the Public Universities Act"),-

(1) in sub-section (3),-

(a) in clause (a),-

(i) for the words "a committee" the words "a search-cumselection committee" shall be substituted;

(ii) for sub-clause (i), the following sub-clause shall be substituted, namely :-

"(i) a member nominated by the Chancellor, who shall be a person of eminence in the sphere of higher education and shall be either an eminent scholar of national repute or a recipient of Padma Award in the field of education;";

(iii) after sub-clause (iii), the following sub-clause shall be inserted, namely :-

"(iv) a member nominated by the Chairman, University Grants Commission;";

(b) for clause (c), the following clause shall be substituted, namely :-

"(c) The members nominated on the committee shall be persons who are not connected in any manner with the university concerned or any college or any recognized institution of that university;";

(c) in clause (d), the word "three" shall be deleted;

(d) in clause (f),-

(i) for sub-clause (i), the following sub-clauses shall be substituted, namely :-

"(i) be a person possessing highest level of competence, integrity, morals and institutional commitment ;

(i-a) be a distinguished academician, with a minimum of ten years of experience as a Professor in any University or ten years of experience in a reputed research or academic administrative organisation with proof of having demonstrated academic leadership ;";

(ii) in sub-clause (iv), for the words "educational qualifications" the words "additional educational qualifications" shall be substituted;

(2) in sub-section (4),-

(a) before the existing proviso, the following proviso shall be inserted, namely :—

"Provided that, if a person selected by the Chancellor does not take over the charge of the post of the Vice-Chancellor, the Chancellor may select another suitable person from the remaining persons from the panel or he may call for a fresh panel either from the same committee or after constitution of a new committee for the purpose, from such new committee:";

(b) in the existing proviso, for the words "Provided that," the words "Provided further that," shall be substituted.

**Amendment of section 13 of Mah. VI of 2017.**

**7.** In section 13 of the Public Universities Act, for sub-section (6), the following sub-section shall be substituted, namely :-

"(6) It shall be the prerogative of the Vice-Chancellor to recommend a person to be the Pro-Vice-Chancellor to the Management Council. The Management Council shall, on the recommendation of the ViceChancellor, appoint a Pro-Vice-Chancellor for the university.".

**Amendment of section 109 of Mah. VI of 2017.**

**8.** In section 109 of the Public Universities Act,-

---

**From : K.K. Theckedath,** Ex-President, AIFUCTO.

**To :** The President and General Secretary, AIFUCTO.

**DEC 12, 2022.**

Dear Prof Kesab Bhattacharya and Prof Arun Kumar,

**Subject: Demand of Old Pension Scheme.**

As you know, in most of the states in the country, while 40 percent of the employees and teachers are in the old pension scheme, the remaining 60 percent ( younger teachers who joined after 2004) are in the New Pension Scheme. **Hence there is an urgent demand from the majority of the teachers in the universities and colleges that the NPS should be scrapped and the OPS should be restored.**

Clearly, this is not a demand that can be achieved by the AIFUCTO fighting alone.

It is therefore a very important development that on Dec 8 a Joint Convention of employees and teachers was held at the Talkatora stadium in New Delhi under the leadership of the All India State Govt Employees Federation and the Confederation of Central Govt Employees and Workers.

The declaration adopted at this Joint Convention is being sent to you separately. The first issue in the declaration is of the Old Pension Scheme. The declaration calls for united meetings of Central/state govt employees and teachers in all the states during the month of January 2023, a National Parliament Dharna during the coming budget session, and a Parliament March in September 2023.

I would request you to call a meeting of the National Executive Committee soon and consider my proposal that the AIFUCTO should be a part of this movement for the Old Pension scheme.

With greetings,

**K. K. Theckedath,** Ex-President, AIFUCTO.

(1) in sub-section (3), after clause (g), for the second proviso, the following proviso shall be substituted, namely :-

"Provided further that, with a view to extend the dates of making application for seeking Letter of Intent for opening new college or institution of higher learning, scrutiny of application by the Board of Deans and forwarding the same to the State Government and grant of Letter of Intent by the State Government, for the academic year 2023-2024, the day or dates referred to in clauses (a), (c) and (d) of sub-section (3) as specified in column (2) of the Table given below, shall be read as day or dates as provided in column (3) of the said Table :—

TABLE

| Clauses | Day or dates provided in existing provision | Day or dates provided for Academic Year 2023-24 |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| (a) | before the last day of September of the year preceding the year in which the Letter of Intent is sought. | on or before 15th January 2023 |
| (c) | on or before 30th of November of the year in which such application is received by the university. | on or before 28th February 2023 |
| (d) | on or before 31st January of the immediately following year after the recommendations of the university. | on or before 1st April 2023."; |

(2) in sub-section (4), after clause (d), for the second proviso, the following proviso shall be substituted, namely :-

"Provided further that, with a view to extend the date of making application for seeking permission to start a new course of study, subjects, faculties, additional divisions or satellite centers for the academic year 2023-24, the day or date referred to in clause (a) of sub-section (4) as specified in column (2) of the Table given below, shall be read as day or date as provided in column (3) of the said Table :-

TABLE

| Clause | Day or dates provided in existing provision | Day or date provided for Academic Year 2023-24 |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| (a) | before the last day of September of the year preceding the year in which the permission is sought. | on or before 15th January 2023 |

### *STATEMENT*

Sections 10 and 10A of the Yashwantrao Chavan Maharashtra Open University Act, 1989 (Mah. XX of 1989), sections 12 and 13 of the Kavi Kulaguru Kalidas Sanskrit Vishvavidyalaya (University) Act, 1997 (Mah. XXXIII of 1997) and sections 11 and 13 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. VI of 2017) provides **for eligibility criteria and constitution of Selection Committee for appointment of Vice-Chancellor and appointment of Pro-Vice-Chancellor.**

2. The provisions of the eligibility criteria and constitution of Selection Committee for appointment of Vice-Chancellor and appointment of Pro-Vice Chancellor **have been modified subsequently by the University Grants Commission vide the University Grants Commission (Minimum Qualifications for Appointment of Teachers and other Academic Staff in Universities and Colleges and other Measures for the Maintenance of Standards in Higher Education) Regulations, 2018** framed under the University Grants Commission Act, 1956 (3 of 1956).

3. **The Supreme Court has recently in the cases of Gambhirdan K Gadhvi v/s State of Gujarat & Ors. (Writ Petition (Civil) No. 1525 of 2019) and Professor (Dr.) Sreejith P.S. v/s Dr. Rajasree M.S.& Ors. (Civil Appeal Nos. 7634-7635 of 2022), held** that the eligibility criteria and appointment of Vice-Chancellor shall be always as per the relevant **UGC Regulations and the State Act if not on a par with the UGC Regulations must be amended to bring it on a par with the applicable UGC Regulations and until then it is the applicable UGC Regulations that shall prevail.**

4. The terms of Vice-Chancellors and Pro-Vice-Chancellors of certain universities in the State have already expired and new appointments are due.

5. In view of above, the existing provisions regarding appointments of Vice-Chancellors and Pro-Vice-Chancellors contained in the said **State Acts relating to universities needs to be amended suitably so as to make them in consonance with the UGC Regulations.**

6. Section 109 of the Maharashtra Public Universities Act, 2016 provides for certain time limits for various stages in the process of granting permission for opening new college or institution of higher learning, new course of study, subjects, faculties, additional divisions or satellite centers.

The time limits for various stages in the process of granting permission for opening new college or institution of higher learning, new course of study, etc., were extended for the academic year 2022-23. Due to which the procedure for permission for opening new college or new course, etc., from the academic year 2023-24 could not be carried out within the specified time limit therefor. Therefore, it is considered expedient to specify extended time limit for the same for the academic year 2023-24.

7. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Yashwantrao Chavan Maharashtra Open University Act, 1989, the Kavi Kulaguru Kalidas Sanskrit Vishvavidyalaya (University) Act, 1997 and the Maharashtra Public Universities Act, 2016, for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

**BHAGAT SINGH KOSHYARI,**
Mumbai, Governor of Maharashtra.

Dated the 24th November 2022.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**VIKAS CHANDRA RASTOGI,**
Principal Secretary to Government.

# हे अग्निदिव्य नाही तर काय होते..?

- डॉ. शरद कळणावत

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे व 'नुटा' चे माजी उपाध्यक्ष*

उच्च शिक्षण क्षेत्रात घडणाऱ्या बारीक सारीक घटनांचे व अवस्थांचे तपशील जपून ठेवणे हे काम प्रा.बी.टी.देशमुख ह्यांनी एखाद्या तपस्व्या सारखे निष्ठेने अविरतपणे केले, ते अपूर्व आहे. संघटनेच्या जन्मापूर्वी पासून सारा अहवाल हा केवळ ह्या एका व्यक्तीच्या स्मरणात व संग्रही आहे. असा अधिकृत इतिहास पुढच्या पिढी साठी उपलब्ध करून देणे हे तपःपूत कार्य केल्याबद्दल व करत असल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे ते थोडेच आहे.

परवा यवतमाळच्या आमसभेनंतर अध्यक्ष डॉ. प्रवीण रघुवंशी यांनी मला "वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना विशेषांक" आणि तीन "वेतन आयोग संघर्ष विशेषांक" असे चार अंक वाचायला दिले. **ह्या वेतन व्यवस्थेसाठी केलेला संघर्ष प्रत्यक्ष अनुभवल्यामुळे बरेच काही सांगण्यासारखे होते.** बी.टीं. नी तसे सुचवले म्हणून केलेला हा प्रपंच.

फारसं उजाडलं नव्हतं. तुरळक शासकीय, काही मिशनरी, तशीच काही दानशूरांच्या आधारे उभी राहिलेली व काही थोर समाजसेवकांनी समाज हितबुद्धीने काढलेली अशी मोजकी महाविद्यालये होती. पदव्युत्तर शिक्षणाची सोय सुद्धा प्रमुख शहरात असे. त्यामुळे प्राध्यापक वर्ग ही सीमित होता. ह्या क्षेत्रात आलेले सर्व उच्च विद्या विभूषित, जाणून, समजून निष्ठेने हे कार्य स्वीकारलेले आदरणीय असे विद्वान होते. समाजात सन्माननीय असणारा हा वर्ग निर्भयपणे ज्ञानार्जन अन् विद्यादान करायचा. पण सर्वसाधारण लोक ह्यांच्याशी सुरक्षित अंतर ठेऊन असत. ह्या अध्यापकांना मानधनासारखे वेतन वेळेवर व विनासायास मिळे. तेही सुरक्षितपणे एकाग्रतेने शिकवू शकत.

पुढे हा व्यवसाय आहे आणि यातही बाकी व्यवसायांप्रमाणेच वेळोवेळी काही समस्या निर्माण होताच काहींना संघटित होण्याची गरज भासू लागली. १७ मार्च १९६३ रोजी 'नूटा'ची स्थापना झाली. पुढे खेडोपाडी शिक्षणाचा प्रसार व्हावा, शिक्षण दारोदारी पोचावे म्हणून भराभर महाविद्यालये स्थापन होत गेली. पुढारी, धनिक, काही ठिकाणी समाजाची म्हणून प्रतिष्ठित लोकांनी पुढाकार घेतला. ह्या महाविद्यालयात विविध विषयांच्या प्राध्यापकांची गरज निर्माण झाली.

**पदव्युत्तर शिक्षणाची मर्यादित सोय, त्यामुळे त्यातून आलेले अनेक लोक वेगवेगळ्या व्यवसायात सामावून जायचे. अध्यापनाकडे येण्याचा फारसा कल नसे. पण आता गावोगावी प्राध्यापकांच्या जागा निर्माण झाल्यामुळे पात्र व्यक्तींना ह्या व्यवसायात येण्याचे आकर्षण वाटू लागले.** सुरुवातीला व्यवस्थापन, विद्यापीठातील मान्यवर शिक्षकांकडे सल्ला मागायचे. ह्या गुरुवर्यांनी सुचवलेल्या पात्र व्यक्तींना चटकन विनासायास नोकरी मिळे. पण ही अनुकूलता प्राध्यापकांसाठी फार थोडा काळ राहिली.

संस्था काढण्याचा उद्देश स्तुत्य होता. उत्साह अनावर होता. स्थापन केलेल्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेश देणं सुरू झालं आणि प्राध्यापक नेमताना पात्र आणि आपले अपात्र ही नेमल्या गेले. सुरवातीच्या काळात ह्या महाविद्यालयांच्या बाबतीत विद्यापीठाचे धोरण थोडे शिथिल होते. आधी सहज सोपे वाटणारे काम किती अवघड आहे हे व्यवस्थापकांनाही जाणवू लागले. **साधन सामग्रीत थोडे फार जमवून घेता आले तरी श्रमिकांच्या वेतनाचा प्रश्न भेडसावू लागला. जमा केलेला निधी, संचित संपत आले. उदारपणे एकवेळ देणगी देणे आणि संस्थेची रोजची गरज भागवण्यासाठी झरा बनून सतत देत राहणे - कुठेच शक्य होत नव्हते.**

निरुपायाने का होईना पण संस्थाचालकांकडून स्नेहाचे आवाहन सुरू झाले. "ही संस्था म्हणजे आपलं कुटुंब, आपण परस्पर सहकार्य करण्याची गरज, संस्था अखेर तुमच्यासाठीच आहे, आपण त्याग केला पाहिजे" इ. भावनिक आवाहन सुरू झाले. हे प्रश्न केवळ एकवेळच्या त्यागाने सुटण्यासारखे नव्हते. **प्राध्यापक बाहेरगावाहून आलेले, राहण्या खाण्याची सोय करताना डबघाईस यायचे. प्राध्यापकांची पिढी पीडित होऊ लागली. समस्या सर्व प्राध्यापकांची होती. पण माणसं विस्कळित एक एकटी होती. मांजराच्या गळ्यात घंटा कोणी बांधायची? आणि बराच काळ मांजर नेमके कोण हे ही कळत नव्हते. विरोधी कोणीच नव्हते पण प्राध्यापक होरपळत होते ही वस्तुस्थिती होती. पाहता पाहता ज्ञानार्जनाचं हे पवित्र क्षेत्र पार डागाळून गेले.**

**उच्च शिक्षण क्षेत्रात एक भयग्रस्त सोशिक वर्ग जन्माला आला.** त्याकाळी विधान परिषद सभासद सन्माननीय ग.प्र.प्रधान यांनी हा प्रश्न सभागृहात विचारला होता. ते म्हणाले "ज्याने एम.ए. होऊन दोन वर्षे एखाद्या संस्थेत काम केलेले आहे. त्याच्या मनात भीतीची आणि असुरक्षिततेची भावना आपण निर्माण करतो. म्हणजे त्याच्या जीवनाला योग्य चालना देतो काय? याचा आपण विचार केला पाहिजे. तो जर आपल्या भविष्याविषयी साशंक असेल तर त्याचे मन आपल्या कामात लागणार नाही. मुलांच्या शिक्षणावर परिणाम होईल. ह्या गोष्टीची आम्हाला चांगली कल्पना आहे की जर आपल्या मनात असुरक्षिततेचे वातावरण असेल तर आपण जे काम करतो त्यात रस घेऊन चांगल्या प्रकारचे काम करावे असे कसे वाटेल?" पण ह्याची दखल सहजपणे कोणी घेईल अशी अवस्था तेव्हा नव्हती.

स्वामी विवेकानंद म्हणतात - "भय माणसाला निर्बल बनवते आणि दुर्बलतेतून अपराध, पापांचा जन्म होतो. म्हणून निर्भय व्हा. दुबळेपणा सारखे पाप नाही." अन् त्याच ज्ञानाच्या क्षेत्रात ही भयग्रस्तता ज्ञानदान करणाऱ्यांना सतत पोखरत होती. एकमेकांशी बोलताना, "आपण पोटासाठी आलो आहोत, हे जे आहे ते सहन केले पाहिजे" हे हताशपणे बोलले जाई. गावात परस्पर विरोधी संचालकांच्या संस्थांमधील शिक्षक, कर्मचारी एकमेकांशी बोलायलाही घाबरत, भेटण्याचं टाळत. आमचे मालक केव्हा आमची विकेट घेतील हे भय खाजगीत बोलून दाखवत.

प्राचार्यांसकट सारेच अध्यापक असुरक्षिततेच्या भीतीने ग्रासलेले असल्याने वरिष्ठांची मर्जी सांभाळण्याचा नवा उद्योग सुरू झाला. अभ्यास करणे, विद्यार्थ्यांना शिकवणे दुय्यम झाले. संस्थेत संचालक, त्यांचे पुढारी, मान्यवर यायचे त्यावेळी काही ठिकाणी प्राध्यापक स्वागतासाठी रांगेने उभे रहात. तर काही ठिकाणी जेवणाचा कार्यक्रम असला की वाढण्याचे काम प्राध्यापकांकडे असे. अशावेळी प्राध्यापक परस्परात बोलायचे "आज आमचा वाढदिवस आहे." पण संघटित होणे हा अपराध वाटे. फार थोडे लोक धाडस करून एकत्र येत. आपण उदरभरणासाठी या ठिकाणी आलो हे पुनःपुन्हा हट्टाने सांगत. तशात संघटनेची हाक ऐकू यायला लागली. तरीही संकोच, भीती होतीच जवळ जवळ १९६३ पर्यंत संघटित व्हावे असा विचार कार्यान्वित झाला नाही.

मात्र संघटित व्हावे ह्या निग्रहाने काही प्राध्यापक हळू हळू जवळ येऊ लागले. परस्परांना धीर देत संघटनानिर्मितीचा प्रयत्न प्रत्यक्षात आला. 'नूटा'ची ही निर्मिती साऱ्या महाराष्ट्रातील प्राध्यापकांसाठी संजीवक ठरली. पुढचा सारा अहवाल अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुखांनी प्रत्येक महाविद्यालयात सभा घेऊन सर्वांपर्यंत पोचेल अशी व्यवस्था केली. **'नूटा बुलेटिन' ह्या प्रभावी माध्यमाने प्राध्यापकांमधे चेतना निर्माण करण्यात फार मोठे काम केले. ह्यातून केवळ प्रश्नांचा आढावा नव्हे तर ते सोडवण्याचे विधायक उपायही सभासदांना कळू लागले. प्राध्यापक आप आपल्या व्यथा घेऊन सभासद होत गेले. हा सारा तपशील आता बुलेटिन मुळे सर्वांसाठी उपलब्ध झाला आहे.**

सुरवातीला मार्गात केवढे अडथळे होते हे पाहिले की कळते या वर्गाला आजची व्यवस्था हस्तगत करण्यासाठी कोणत्या दिव्यातून जावे लागले. एक सार्वत्रिक प्रचार व्हायचा, गुरुच्या पवित्र स्थानी आरूढ असलेले हे गुरुवर्य पगारासाठी किती खालच्या स्तरावर लढताहेत. हा प्रचार अनेकांना भावणारा होता. त्यामुळे संघर्ष सोपा किंवा साधारण नव्हता. समाजाला आपली बाजू समजावून सांगणे हे अत्यंत जिकिरीचे काम प्राध्यापकांना करावे लागले. त्यावेळी "प्राध्यापक रस्त्यावर का येतात?" ही मुद्रित पुस्तिका काढून प्रा.बी.टीं. नी प्रसृत केली. परिणामी ह्या संघर्षाचे स्वरूप व निकड ही काळाची गरज असल्याचे तर्कसंगत निवेदन सर्वांपर्यंत पोचले. हे काम समाज जागृतीचे जसे होते तसे ते प्राध्यापकांनाही तपशीलवार कळून त्यांना ते लोकांना समजावून देणे सुलभ झाले.

**संघर्ष निष्फळ करण्यासाठी विद्यार्थ्यांचा वापर करणे. ह्या मार्गाचा ही राजकीय, व्यवस्थापकीय स्तरावर प्रयत्न झाला. विद्यार्थ्यांना फितवणे फार सोपे आहे. ह्या भाबड्या समजुतीने हाहि प्रयत्न अयशस्वी झाला.** पण संघटनेकडून शिस्तबद्ध पद्धतीने ठिकठिकाणी सभा घेऊन प्राध्यापक व विद्यार्थी जागृतीचे कार्य यशस्वीपणे झाल्याने संघर्षात शिथिलता आली नाही. **विद्यार्थी सुद्धा प्राध्यापकांची बाजू समजून केवळ समाधानी झाले नाही तर जागृत होऊन ह्या लढ्याला त्यांनी भक्कम पाठिंबा दिला. पुढे विद्यार्थी संघटनांनीही ह्या संघर्षाचे समर्थन केले.** आता प्राध्यापकांनाही "केवळ पोटासाठी"या न्यूनगंडाने पछाडले नाही, उलट विद्यार्थ्यांना शिकवणे एवढेच आपले काम, ह्या भ्रमातून निघून समाजभान असणे किती महत्वाचे आहे याचा प्राध्यापकांना पुरेपूर प्रत्यय आला. ह्या संपूर्ण लढ्यात

संघटना कधीही विधायक भूमिके पासून ढळली नाही.

तसा हा लढा केवळ नियमित व पूर्ण वेतनासाठी नव्हता. प्राध्यापकांनी फक्त पगारासाठी (मजुरी) विद्यार्थ्यांना वेठीस धरले - काय हा क्षुद्रपणा ! अशी मुखंडांची टीका येतच राहिली. प्रश्न जटिल होते. **एका अकल्पित संकटात हा वर्ग ग्रासला जात होता. बहुतांश लोकांचा संसार उधारीवर चालणारा, दुकानदाराला दिलेला शब्द गुरुजींना पाळता येत नव्हता. सांसारिक अडचणी, कुटुंबाचे हाल, मुलांची आबाळ ह्या यातना सोसाव्या लागत होत्या. याचा परिणाम घरीदारी अपमानास्पद वागणूक, त्यातून येणारी आत्मग्लानी यामुळे सतत मनावरचा ताण त्रस्त करत असे.** नोकरी गेली तर? भय होतेच. **या सर्व अनिष्टांवर मात करण्यासाठी व पूर्णवेतन नियमित, वेळेवर मिळण्यासाठी सफल संघर्ष केला गेला. तो संघटनेच्या माध्यमातून संघटितपणे झाल्याने कुठल्याही पावलावर घातपात झाला नाही. सर्वांना संघटनेची निकड लक्षात आली. काठावर बसून दर्शकाच्या भूमिकेत वावरणारे ही पुढे एकत्र येत गेले.**

व्यवसायाशी निगडित कोणतीही वैध मागणी सहजपणे मान्य झाली असे होत नाही हाच सर्वांचा अनुभव आहे. तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या वेतन आयोगाच्या संघर्षाचा साधार अहवाल प्रा.बी.टी.देशमुखांनी सर्वांसमोर ठेवलाच आहे. त्याचे सार हेच सांगते - **कोणताही संघर्ष पूर्ण झाला असे कधीच होत नाही. व्यावसायिक संघटनांचा एक संघर्ष संपला की दुसरा समोर 'आ' वासून तयारच असतो. त्यामुळे सतत जागरुकता अत्यावश्यक असते. एक एकटे राहून कसे हाल होतात हे चांगले लक्षात आल्याने संघटनेच्या छत्राची गरज कळलेली असते. संघटनेत राहून कोणत्याही संघर्षासाठी सिद्ध असणे ही काळाची गरज जाणवू लागते.** ज्याच्या पाठीशी संघटना असते तोच निर्भय, स्वाभिमानी असू शकतो हे आता प्राध्यापकांना चांगलेच कळले आहे.

**जे सर्वांचे होईल तेच आपले ही होईल ह्या धारणेवर आळसावलेल्या अध्यापकांची संख्या पूर्वी बरीच होती - ती आता जवळ जवळ अभावानेच आढळते. संकट केव्हा येईल त्याचा नेम नाही हे सत्य आता सर्व जण जाणतात. पुन्हा संकट कुठल्याही स्तरावर, कोणत्याही दिशेने येऊ शकते. ते आगाऊ सूचना देऊन येत नाही. त्यामुळे अखंड जागृत असणे हे प्रत्येकासाठी आवश्यक आहे.**

आपली अडचण वा व्यथा बोलून दाखवणे म्हणजे संचालकांचा अवमान करणे ठरेल हा प्राध्यापकांचा सुरुवातीचा समज. त्यामुळे एखाद्या चांगल्या कामाची सूचना करायलाही प्राध्यापक धजावत नसत. पण पुढे पुढे प्राध्यापक वर्ग संघटित झाल्यानंतर त्याच्या ठायी किती आणि कशी निर्भयता येते ह्याचे हे एक उदाहरण. एका महाविद्यालयातील प्राध्यापकांनी आपली व्यथा थेट त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांसमोर मांडावी म्हणून एक निवेदन तयार केले. त्या तीन पानी निवेदनाच्या मुखपृष्ठावर त्यांचे छायाचित्र मुद्रित करून त्यावर जो मजकूर होता त्याचा आरंभ असा होता..

**"मा. मुख्यमंत्री श्री...**

**महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्रात उपासमारीने कोणीही मरणार नाही**

**ह्या आपल्या आश्वासनास आज्ञा मानून**

**उपाशी राहिलो पण मेलो नाही..."**

त्या दीर्घ निवेदनावर परस्पर मतभेद विसरुन साऱ्या प्राध्यापकांनी सह्या केल्या होत्या.

त्याचा परिणाम म्हणून तिसऱ्याच दिवशी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह महाविद्यालयाच्या दोन प्राध्यापक प्रतिनिधींना मा. मुख्यमंत्र्यांच्या भेटीस बोलावण्यात आले. एवढेच नव्हे तर प्रतिनिधी वेळेवर मुंबईला बैठकीसाठी पोचू शकतील ही सोय शासकीय स्तरावर करण्यात आली.

एक संघटना सशक्त झाल्यावर अन्य क्षेत्रातही मागोमाग प्राध्यापक जागे

---

*अकृषि विद्यापीठातील रिक्त असलेली शिक्षकीय व शिक्षक समकक्ष पदे भरण्यावरील निर्बंध शिथील करणेबाबत.*

## *महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग,*

### *शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१६६-अ/१७/विशि-१*

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२

### दिनांक : १६ नोव्हेंबर, २०२२

**संदर्भ :** (१) शासननिर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.३०/२०१६/आ.पु.कक्ष, दि. २५ मे, २०१७ (२) शासननिर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-०६१७/प्र.क्र.२०/२०१६/आ.पु.क., दि. ९ जून, २०१७ (३) शासननिर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-०६१७/प्र.क्र.२०/२०१६/आपुक, दि. २९ जून, २०१७ (४) शासननिर्णय समक्रमांक दि. ०७ ऑगस्ट, २०१९ (५) शासननिर्णय, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि. ०४ मे, २०२० (६) वित्त विभाग, पत्र क्र. पदनि-२०२२/प्र.क्र.२८/आयुक्त, दि. १४ नोव्हेंबर, २०२२

### *प्रस्तावना*

संदर्भाधीन क्रमांक (१) येथील वित्त विभाग, शासननिर्णय, दिनांक २५ मे, २०१७ नुसार आकृतिबंध अंतिम मंजूर होईपर्यंत नवीन पदनिर्मिती तसेच पदभरतीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. तसेच सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या बाबींसंदर्भात संदर्भाधीन क्र. ३ येथील शासन परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार विभागाच्या नियंत्रणाखाली असलेली अकृषि विद्यापीठातील शिक्षकीय पदांचा आकृतीबंध सुधारित करण्याची कार्यवाही सुरू आहे. **सुधारित आकृतीबंध अद्याप निश्चित न झाल्याने व सन २०१७ पासून नवीन पदभरतीवर निर्बंध असल्याने या काळात सेवानिवृत्ती व इतर कारणास्तव होणारी रिक्त पदे भरता आली नाहीत.** विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन, संदर्भाधीन क्र. २ येथील शासननिर्णयान्वये गठीत उपसमितीच्या दि. १६.०७.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत उपसमितीने विभागाच्या अधिनस्त असलेल्या १५ अकृषि व अभिमत विद्यापीठांसाठी मंजूर पदांच्या ८० टक्के इतक्या मर्यादेत पदभरती करण्यास मान्यता दिली होती. उपसमितीने दिलेल्या मंजूरीनुसार संदर्भाधीन क्र. ४ येथील शासननिर्णयान्वये विभागाच्या अधिनस्त असलेली राज्यातील अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठांमधील रिक्त ६५९ शिक्षक व शिक्षक समकक्ष पदे भरण्यास शासन मान्यता देण्यात आली होती. **तथापि, वित्त विभागाने संदर्भाधीन क्र. ५ येथील शासननिर्णयान्वये कोव्हिड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत आर्थिक उपाययोजनांचा भाग म्हणून पदभरतीवर निर्बंध आणले होते. त्यामुळे सदर शिक्षक व शिक्षक समकक्ष पदे भरता आली नाहीत.** सदर पदे भरण्यास मंजूरी देण्याचा प्रस्ताव पुन्हा वित्त विभागास सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने पदभरतीस मान्यता देण्यासाठी वित्त विभागाने गठित केलेल्या उपसमितीच्या दि. १८.१०.२०२२ च्या बैठकीमध्ये सदर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. उप समितीने उपरोक्त ६५९ पदे भरण्यास मंजूरी दिली आहे. त्यानुसार आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

### *शासननिर्णय*

शासननिर्णय दि. ०७.०८.२०१९ अन्वये विभागाच्या अधिनस्त असलेल्या १५ अकृषि विद्यापीठे आणि शासन मान्य अभिमत विद्यापीठांसाठी मंजूर असलेल्या शिक्षक व शिक्षक समकक्ष एकूण पदांपैकी ८० टक्के इतक्या मर्यादेत, एकूण ६५९ पदे भरती करण्यास देण्यात आली आहे. पद भरतीस मंजूरी देण्यात आलेल्या पदांचा विद्यापीठनिहाय तपशील **सदर शासननिर्णयासोबतच्या जोडपत्र-१ मध्ये दर्शविण्यात आला आहे. त्यानुषंगाने सदर रिक्त ६५९ पदांची भरती प्रक्रिया शासननिर्णय दि. ०७.०८.२०१९ मध्ये नमूद अटींनुसार पूर्ण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

२. सदर शासननिर्णय मा.अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग व सचिव (व्यय), वित्त विभाग यांच्या उपसमितीने दि. १८.१०.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासननिर्णय महाराष्ट्र शासनाच्या या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२२१११६१९२२३२४९०८ असा आहे. हा शासननिर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(अजित बाविस्कर)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

होऊ लागतात हे नूटाच्या निर्मिती नंतर प्रत्यक्षात घडत गेले.

**नागपूर क्षेत्रात नूटाची स्थापना १७ मार्च १९६३ ला झाली**
**मुंबई विद्यापीठ महाविद्यालयीन शिक्षक संघ ऑक्टोबर १९६६**
**मराठवाडा विद्यापीठ महाविद्यालयीन शिक्षक संघ १९७३**
**पुणे विद्यापीठ महाविद्यालयीन शिक्षक संघ १९७४**
**शिवाजी विद्यापीठ महाविद्यालयीन शिक्षक संघ १९७५**

ह्या सर्वांना एकत्र आणून नूटाचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख ह्यांनी पुढाकार घेऊन ऑक्टोबर १९७४ मध्ये नागपूर येथे बोलावलेल्या महाराष्ट्रातील प्राध्यापक नेत्यांच्या बैठकीत याबाबत विचार मान्य करण्यात आला व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची (एमफक्टो) प्रत्यक्ष स्थापना २ एप्रिल १९७५ रोजी मुंबई येथे बोलावलेल्या बैठकीत झाली. त्याचे सारे यशस्वी परिणाम आज दिसताहेत. त्याने प्राध्यापकांच्या जीवनात केवढा विधायक बदल घडवून आणला तो नूटा बुलेटिनच्या माध्यमातून सर्वांसमोर आहे.

**संघटनेच्या विधायक भूमिकेचा प्रत्यय आल्यानंतर आणि संघटनेच्या अध्यक्षांचा आमदार म्हणून विधानपरिषदेतील अभ्यासपूर्ण सकारात्मक सहभाग अनुभवल्यानंतर शासनाला, नेत्यांना, व्यवस्थापकांनाही हे पटू लागले की प्राध्यापकांचा संघर्ष त्यांच्या विरोधात नाही. तसा तो कोणाच्याही विरोधात नव्हता. वेळोवेळी लादलेल्या अन्यायकारक नियमांमुळे दुष्प्रभावित वर्गाचा त्या बाबी लक्षात आणून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न होता.** अकारण असंतोष निर्माण करणाऱ्या अहंकारी प्रवृत्ती विरुद्ध निरुपायाने करावा लागलेला हा प्रतिकार होता. होणारा अन्याय अभ्यासपूर्ण निवेदनातून योग्य रीतीने लक्षात आणून देणे ही संघटनेची भूमिका राहिली. पण सहज, सच्चेपणाने कुठलेही काम होऊ न देण्याच्या हटवादी वृत्तीने न्याय्य गोष्टींकडे दुर्लक्ष करून सापडेल त्या क्षेत्रात असंतोष सतत जागता ठेवणे हा काही लोकांचा स्वभावधर्मच दिसून येतो. **झारीतले शुक्राचार्य हे उपमान त्यासाठीच वापरले जाते.**

आंदोलनाच्या काळात शिक्षक संघटनेमुळे भयभीत झालेल्या वर्गाचा चळवळीला बदनाम करणे हा एकच ध्यास होता. हे प्राध्यापक विद्यार्थ्यांचे कसे अहित करत आहेत हे तुणतुणे सतत वाजवणे हे त्यांनी अंगावर घेतले होते. ह्या पगारी प्राध्यापकांना विद्यार्थ्यांची काळजी नाही. त्यांनी विद्यार्थ्यांना वेठीस धरले आहे. प्राध्यापकांसारख्या आदरणीय लोकांना हे शोभत नाही. ह्यांना काम कमी व वेतन भरपूर पाहिजे. यांच्या बेताल वागण्याने विद्यार्थ्यांवर किती वाईट परिणाम होईल? ह्या प्रचारासोबत विद्यार्थ्यांना चिथावण्याचा प्रयत्न झाला. पण त्याचा फारसा परिणाम झाला नाही. विद्यार्थी आपल्या गुरुंची वेतना अभावी काय दुर्दशा होते हे जवळून पाहात होते. या अन्यायाविरुद्ध विद्यार्थ्यांनीही भक्कम साथ दिली पण ह्या संघर्षात प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना ओढण्याचा प्रयत्न कधीही केला नाही हे लक्षणीय आहे.

**या संघर्षात नूटा बुलेटिन प्रत्येक सभासदा जवळ असल्याचा लाभ विलक्षण होता. इतकी प्रभावी संपर्क व्यवस्था तशी दुर्मिळ असते. प्रत्येक व्यक्तीला लढ्यात सहभागी होताना आपण कशासाठी लढत आहोत, आपले लक्ष्य काय आहे हे माहित असले पाहिजे ही दक्षता अतिशय उपयुक्त ठरली.**

**संघर्षात सगळ्यांनाच लक्षात आले दुखणे आणि त्याचे निदान अचूक कळण्यासाठी गहन अध्ययन या सारखे परिणामकारक अस्त्र नाही. त्यामुळे विरोध करणारे पार हतबल होतात. विरोध बोथट होतो.** संघर्ष करणारा कोणत्याही आघातावाचून तो परतवून लावू शकतो. प्रा.बी.टी.देशमुखांचा अभ्यास आणि त्यांचे आमदार म्हणून निर्णय प्रक्रियेत सहभागी असणे हे संघटनेचे दुर्लभ भक्कम सामर्थ्य होते.

संघटनेच्या शिस्तपूर्ण अथक परिश्रमामुळे संघटनेला आपल्या अध्यक्षाला विधानपरिषदेत आमदार म्हणून सन्मानपूर्वक निवडून देता आले. त्याचा प्रत्यक्ष प्रभाव केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर अखिल भारतीय स्तरावरही सर्व शिक्षक संघटनांनी अभिमानपूर्वक अनुभवला.

**या काळात शासकीय, व्यवस्थापकीय क्षेत्रात अनेक आवाहनांच्या माध्यमातून तोडफोड होत नव्हती असे नाही. पण सुदैवाने अनुकूल - प्रतिकूल काय ह्याचे शिस्तबद्ध प्रबोधन सतत होत राहिले. संघटनेचे पदाधिकारी व स्वतः अध्यक्षांनीही अहोरात्र कष्ट केले म्हणून या सत्कार्यात कधीही खंड पडला नाही.**

ह्या संघर्षाचा ताण संपला, प्राध्यापकांना अतीव आनंद झाला पण ह्यात बेभान होऊन चालत नाही हे प्रत्येक वेळी जाणवले. पदरी पडणाऱ्या लाभाचा हिशेब करण्यात दंग प्राध्यापकांना हा संघर्षानुभव सांगतो **"घरट्याचे काम थांबवा थोडे, सारे रानच पेटले आहे".** आनंद अनुभवतानाच आगामी संघर्षाकडेही लक्ष ठेवले पाहिजे ही संघटनेची शिकवण राहिली.

**संघर्ष सफल झाल्यावर, संख्येने फार थोडे पण जे संघर्षापासून दूर राहिले. त्यावर पुढे न आलेल्या एका दीर्घ कवितेतील काही ओळी -**

## *मित्रा ! युद्ध संपले सुद्धा*

तू झोपलास
तोंडावर आवरण घेऊन
खग्रास डोळ्यात
दुःस्वप्ने रंगवीत
आभाळ कोसळेल
फक्त ह्यांच्याच घरावर
वर्षाव होईल
रक्त मांसाचा, हाडांचा
काहीच कसे झाले नाही रे
**युद्ध संपले सुद्धा !**

मित्रा आम्ही वाट पाहिली तुझी
साधी 'ओ' सुद्धा दिली नाहीस
सोवळे नेसून शत्रू सोबत
पूजेला बसला होतास म्हणे !
आम्हाला बुडवून पाण्यात
कुणाला घालत होतास साकडे?
तू व्रतस्थ राहिलास
**येथे युद्ध संपले सुद्धा**

युद्धाचा विटाळ झाला नाही, त्यांचा सी आर चांगला राहातो,
सन्यस्त वृत्तीने एकलेपणाने समूहापासून दूर राहतात
त्यांचा शेवटचा घास गोड होतो.....

**जे आंदोलनात नसतात त्यांच्यासाठी पुढे आलेल्या काही पुढील ओळी -**

## *जे आंदोलनात नसतात...,*

ते कुणाला घाबरताहेत?
त्यांचे त्यांनाच माहीत नाही...

उदरातून ... तिमिरातून
गच्च डोळे मिटून जन्म घेतलेल्यांना
"घाबरणे"
एवढ्याच एका सत्याचा प्रत्यय
आलेला...

आता ते धीट आहेत...
मुठी वळून ... पाळण्यात
डोळे मिटून...
ते म्हणताहेत...
आम्ही प्रकाशाला शरण जाणार
नाही, तुमच्या सारखे...

हा वर्ग छोटा आहे
चांगले आहे...

अनेकांनी डोळे उघडून उजेड पाहिला
तेवढीच आशेला जागा आहे...
उघड्या डोळ्यांनी संघटना केली
मिटल्या डोळ्यांना मानवले नाही...
घाबरतच जगलेले ... जगणारे
गच्च डोळे मिटलेले
ते एकाकी
आपआपली वेगळी उंची मोजणारे लोक
इतरांना हिणवतात ... म्हणतात
"हे संघटनावाले
आंधळेपणाने सामील होणारे
आदेशावर कार्यक्रम करणारे..."
"आम्ही मात्र स्वतंत्र
बुद्धिमान ... टोकावरचे
पांडित्याचे मुकुट धारक..."

मुकुटासकट यांच्या माना
कितीदा तरी मोडून पडतात...
पण ते सारे अंधारातले असते...
तेही मरतात बिनबोभाट ... पण
ते "उदात्त आत्मसमर्पण" असते...
मात्र संघटितांनी मरून
... मंथन करून
आणलेल्या अमृताने
ओठ ओले करून घेणाऱ्यात
ते अग्रणी असतात...

उच्च पदस्थांचा
तो अधिकारच असतो...
सारेच डोळे मिटून चालते

त्यांच्याकडे पाहू नका...
त्याने ते लाजतील असे समजू नका
... फार तर ते चिडतील
तुम्हालाच "मेंढरं" म्हणून हिणवतील
पराभूत जीवनाचे
उदात्तीकरण करण्याचा
एक मंत्र त्यांना गवसला आहे.

ते महान आहेत
गच्च डोळे मिटून घेतलेले आहेत
म्हणून काय झाले?
त्यांचा राग मानू नका...

अखेर तेही उदरातून जन्मलेले आहेत
आपल्या सारखे
या सहोदरांना
उदार मनानं
क्षमा करा...

वेळोवेळी कराव्या लागलेल्या संघर्षात हिरीरीने भाग घेतलेले संघटनेचे अनेक पदाधिकारी, सभासद आज हयात नाहीत. संघर्षात पूर्णवेळ स्वतःला झोकून देऊन **ज्यांनी हे अतुलनीय यश -** प्रोबेशन, कन्फर्मेशन, प्रमोशन, न्यायाधिकरण, अतिरिक्त झाल्यास समायोजन, वेतन वितरण, सेवानिवृत्ती वेतन, रजाप्रवास सवलत, वैद्यकीय सुविधा, सुरक्षितता आदि **- आपल्या सर्वांना मिळवून दिले त्यांचे आपण कायम ऋणी आहोत - ते कायम आपल्या स्मरणात राहतील.**

**- डॉ. शरद कळणावत**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## अंतर्गत सर्व प्राध्यापक संघटना : ०८.०७.२०२२

प्रति,
**श्री.एकनाथजी शिंदे,**
मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
प्रति,
**मा.प्रधान सचिव,** उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

**द्वारा :** विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, औरंगाबाद

**संदर्भ :** संचालक उच्च शिक्षण विभाग, पुणे यांचे परिपत्रक दि. ७ जुलै २०२२

**विषय : (१)** संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी राज्यातील सर्व सहसंचालक कार्यालयात प्राध्यापकांना प्रवेश बंदी केल्याबद्दलच्या परिपत्रकाचा जाहीर निषेध (२) डॉ.धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे यांची वैद्यकीय तपासणी करणे बाबत

**"व्यक्तीप्रमाणे व्यवस्थाही घसरली तर होणारे नुकसान मोठे आणि दीर्घकालीन असते. व्यक्तीची हकालपट्टी करता येते पण सडू लागलेली व्यवस्था पुन्हा निरोगी करणे महाकठीण"**

महोदय,

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकानुसार संचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे यांनी राज्यातील सर्व सहसंचालक कार्यालयात महाविद्यालयीन प्राध्यापकांना प्रवेश बंदी करून त्याऐवजी महाविद्यालयातील 'संपर्क अधिकारी' म्हणून एक कर्मचारी नेमण्याचे आदेश दिलेले आहेत. **जर प्राध्यापकाने सहसंचालक कार्यालयात पाऊल ठेवल्यास प्राचार्यांना जबाबदार धरण्यात येईल, असे धमकीवजा आदेशच उच्च शिक्षण संचालकांनी दिले आहेत.**

हे आदेश लोकशाही विरोधी, सहसंचालक कार्यालयात भ्रष्टाचार करण्यासाठी कोणाच्याही मनात कसलीही भीती उत्पन्न होऊ नये व त्याद्वारे मनमानी कारभार करण्याचे प्रयोजन आहे. या आदेशाद्वारे प्रत्येक महाविद्यालयात नेमलेला सहसंचालक कार्यालयाचा संपर्क अधिकारी हा सचिन वाझे सारखा वसूली अधिकारी बनणार की काय? प्राचार्यांच्या नियंत्रणाखाली अशी बिनबोभाट वसूली सुरू होईल व लाचलुचपत कारवाई मध्येही आपले सहसंचालक अडकणार नाही व पैशाचा नित्य ओघ राहील अशी उलटसुलट चर्चा शिक्षण क्षेत्रात सुरू झाली आहे. दि. ३० जून २०२२ रोजी अमरावतीचा लाचखोर सहसंचालक डॉ.मुरलीधर प्रभाकर वाडेकर याला तीस हजाराची लाच घेतांना व्यथित प्राध्यापकांनी पकडून दिल्याने सहसंचालक कार्यालयात प्राध्यापकांना पूर्वीपासून लुटले जाते, हे स्पष्ट झालेले आहे. 'चोराच्या उलट्या बोंबा' या म्हणीप्रमाणे हे परिपत्रक निर्गमित करतांना संचालकांची नेमकी भूमिका कोणती? असे प्रश्न निर्माण होत आहेत. **सहसंचालक कार्यालये शिस्तीत चालली पाहिजेत, दफ्तर दिरंगाई थांबली पाहिजे, कॅसची वेळेवर वेतन निश्चिती, सेवानिवृत्ती प्रकरणे, वैद्यकीय देयक, भविष्य निर्वाह देयक, कॅसची विविध थकीत देयके, अपील, तक्रार ई. कामे महिना-महिना प्रलंबित असल्यामुळे महाविद्यालयातील प्राध्यापक सहसंचालक कार्यालयात येतो.** ही कामे वेळेवर व फुकट झाली तर सहसंचालक कार्यालयात पाऊल ठेवण्याची कोणालाही हौस नाही. सहसंचालक कार्यालयात वेतन निश्चितीसाठी मोठ्या प्रमाणात पैसे घेतले जातात. औरंगाबाद येथील माजी सहसंचालकाने प्रशासकीय व वित्तीय अनियमितता (भ्रष्टाचार?) केली म्हणून त्यास तातडीने पदमुक्त केले आहे. गेल्यावर्षी या कार्यालयात एक वरिष्ठ लिपिक लाचलुचपतच्या जाळ्यात अडकला होता, बदल्यात कार्यालयीन अधिक्षकाची नागपूरला बदली करून प्रकरण शांत केले होते. **त्यामुळे अनेक प्राध्यापकांकडून पैसे घेण्यापेक्षा कॉलेज स्तरावर एका वसूली अधिकाऱ्याची नेमणूक केली म्हणजे धोका कमी होतो, असा या परिपत्रकाचा अर्थ निघत आहे.** असे षड्यंत्र सुरू करण्यापेक्षा 'आपल्या बुडाखाली काय जळतंय' हे बघितलं पाहिजे. आम्हावर बंधने लादण्यापेक्षा आपला कारभार सुधारला पाहिजे म्हणून आपण आपल्या स्तरावरून संचालकांना हे परिपत्रक रद्द करण्याचे आदेश द्यावेत. संचालकाने असे उलटे कुटाने करण्याऐवजी सर्व सहसंचालक प्रामाणिकपणे कसे काम करतील, सहसंचालक कार्यालयाच्या वेबसाईट्स अद्यायवत कशा होतील? हे बघावे. या परिपत्रकामुळे शासनाची जी बेअदबी झाली आहे, त्यामुळे संचालक यांचेवर प्रशासकीय कारवाई करावी. तसेच डॉ.धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे प्रकृतीबाबत सोशल मेडियामध्ये उलट-सुलट चर्चा चालू झाल्या आहेत, करिता शासनाने त्यांची त्वरित शासकीय स्तरावरून वैद्यकीय तपासणी करण्याचा निर्णय घ्यावा, व ते या पदासाठी सक्षम आहे की नाही? याची खात्री करून घ्यावी, अशी आम्ही आपणास विनंती करत आहोत.

कळावे,

**आपले विश्वासू**

(१) प्रा.डॉ.विक्रम खिलारे (२) प्रा.डॉ.उमाकांत राठोड
(३) प्रा.डॉ.फुलचंद सलामपूरे (४) प्रा.डॉ.दिलीप बिसरे
(५) प्रा.डॉ.बप्पा म्हसके (६) प्रा.डॉ. मारोती तेगमपूरे व ३५ इतर.

---

*महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय*
शासन परिपत्र क्रमांक : संकीर्ण २०२०/(६३/२०)-प्रशा-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०००३२
**दिनांक : ९ जून, २०२० : परिपत्रक**

विभागामध्ये प्राप्त झालेले अर्ज/तक्रारी/प्रस्ताव/अपिल/वेतन देयके व अन्य देयके/सेवानिवृत्ती वेतन प्रकरणे/वेतननिश्चिती प्रकरणे व अन्य प्रकरणे निकाली काढण्यात जाणीवपूर्वक दिरंगाई/दुर्लक्ष केले जाते तसेच गहाळ केले जाते. त्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि शिक्षण क्षेत्रातील अन्य घटकांमध्ये अपमान, निराशा आणि संतापाची भावना निर्माण होत आहे. अशी तक्रार मा.श्री.नागो गाणार, वि.प.स. यांनी केली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, कार्यासनात प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर कार्यालयीन कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या **विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००६ मधील तरतुदीनुसार विहित कालावधीमध्ये कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात यावी.** अन्यथा कार्यासनातील कसूर निदर्शनास आल्यास संबंधितांवर, **सदर अधिनियमातील कलम १०(३) नुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

**(आ.रा.राजपूत)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,** (१) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई (२) सर्व सहायक कक्ष अधिकारी व लिपिक-टंकलेखक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई (३) कार्यासन अधिकारी (प्रशा.५), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या संदर्भात आवश्यक कार्यवाहीकरिता मा.श्री.नागो गाणार, वि.प.स. यांच्या दि. १७.०२.२०२० रोजीच्या पत्रासह (४) श्री.नागो. पुं.गाणार, वि.प.स., सी.पी.ॲन्ड बेरार प्राथमिक शाळा परिसर, शिरसपेठ, नागपूर-४४०००९

---

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/078/2021-23 (Uploaded on www.nuta.in on 22.12.2022) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 01.01.2023**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---------------------------------------------------

To,.......................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................